# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव



# आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

## Department of Lifelong Learning & Extension (DLLE)

## पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम

**(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शिक्षणक्रम संरचना)**

## प्रवेशप्रक्रिया -2023-2024

## माहितीपुस्तिका




**Contact Details**

**Department of Lifelong Learning & Extension (DLLE)**
**Dr.A.P.J. Abdul Kalam Vidyarthi Bhavan,**
**1st Floor,Near Rikshaw Stop**
**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon (MS)**

**Web-page :** https://nmu.ac.in/external-education
**E-mail:** ideal@nmu.ac.in
**Contact:** 0257-2257495/2258496

# विभाग परिचय

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग हा नाविन्यपूर्ण विभाग आहे. या विभागाद्वारे प्रमाणपत्र ते पदव्युत्तर पदवी असे विविध शिक्षणक्रम राबवले जातात. ज्या विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयात जाऊन उच्च शिक्षण घेणे शक्य नाही, जे विद्यार्थी नोकरी-व्यवसाय करत आहेत, गृहिणी आहेत, स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत, तळागाळातील व्यक्ती ज्या शिक्षणापासून वंचित आहेत तसेच नोकरी आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे शिक्षण अपूर्ण राहिले असेल अशा सर्वांना बाहेरून शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाने उचललेले एक अभिनव पाऊल आहे. आजीवन विभाग हा विद्यापीठातील वेगळेपण जोपासणारा विभाग आहे. आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी या विभागाद्वारे आपले पदव्युत्तर शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून विद्यापीठाचे नावलौकिक जोपासले आहे.

## विभागाची वैशिष्ट्ये

1. **काम करता करता बाहेरून उच्च शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देणारा विद्यापीठातील विभाग**
2. **पाठ्यक्रम आणि पदवी विद्यापीठाचीच**
3. **सेमिस्टर पद्धती असल्याने वर्षातून दोन वेळा परीक्षांचे आयोजन**
4. **जळगाव,धुळे,नंदुरबार जिल्ह्यात परीक्षा केंद्रांची सुविधा**
5. **प्रवेश ते पदवी प्रदान अंतर्गत ऑनलाईन अंमलबजवाणी प्रक्रिया**
6. **सर्व विषयांचे स्वयं अध्ययन साहित्य ई-स्वरुपात उपलब्ध**
7. **विविध स्पर्धा परीक्षा,पीएच.डी,नोकरीसाठी पदवीस मान्यता आणि समान संधी.**
8. **रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी संमंत्रण सत्रांचे(Counselling Sessions) ऑनलाईन पद्धतीने आयोजन**

### प्रवेश कोण घेऊ शकतो?

- विद्यार्थी
- शिक्षक
- पालक
- गृहिणी
- निवृत्त व्यक्ती
- व्यावसायिक
- विविध क्षेत्रात कार्यरत कोणतीही व्यक्ती जी प्रवेशाची प्राथमिक अट पूर्ण करू शकते.

# उपलब्ध पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम

| शिक्षणक्रमाचे नाव | प्रवेश पात्रता | परीक्षा, ई-स्वयं अध्ययन साहित्य, अंतर्गत कार्य मार्गदर्शन,पदवी प्रमाणपत्र व संबंधित शुल्का सह एकत्रित शुल्क | |
|---|---|---|---|
| | | **प्रथम वर्ष शुल्क(रू)** | **द्वितीय वर्ष शुल्क(रू)** |
| एम.ए.मराठी (MA.Marathi) | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची/राज्यशासनाद्वारे वा केंद्रशासनाद्वारे मान्यताप्राप्त संस्थेची पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष असलेली पदवी परीक्षा उत्तीर्ण | 8,500/- | 8,800/- |
| एम.ए.हिन्दी (MA.Hindi) | | 8,500/- | 8,800/- |
| एम.ए.इंग्रजी (MA.English) | | 8,500/- | 8,800/- |
| एम.ए.इतिहास MA.History) | | 8,500/- | 8,800/- |
| एम.ए.राज्यशास्र (MA.Political Science) | | 8,500/- | 8,800/- |
| एम.ए.समाजशास्र (MA.Sociology) | | 8,500/- | 8,800/- |
| एम.ए.अर्थशास्र (MA.Economics) | | 8,500/- | 8,800/- |
| एम.ए.संरक्षण व सामरिकशास्र (MA.Defence and Strategic Studies) | | 8,500/- | 8,800/- |
| एम.ए.समुपदेशन मानसशास्र (MA.Counselling Psychology) | | 10,000/- | 10,300/- |
| एम.ए.शिक्षणशास्र (MA.Education) | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची/राज्यशासनाद्वारे वा केंद्रशासनाद्वारे मान्यताप्राप्त संस्थेची<br>• शिक्षणशास्र विषयातील बी.ए. 50% सह उत्तीर्ण<br>**किंवा**<br>• कोणत्याही विषयातील पदवी सोबत डी.एड./डी.टी.एड. 50% सह उत्तीर्ण<br>**किंवा**<br>• बी.एड./बी.पी.एड 50% सह उत्तीर्ण | 15,000/- | 15,300/- |
| एम.कॉम. (M.COM) | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची/राज्यशासनाद्वारे वा केंद्रशासनाद्वारे मान्यताप्राप्त संस्थेची बी.कॉम./बी.बी.ए./बी.एम.एस. परीक्षा उत्तीर्ण किंवा समकक्ष असलेली पदवी परीक्षा उत्तीर्ण | 8,500/- | 8,800/- |

**महत्वाचे :-**

- **एम.ए.समुपदेशन मानसशास्र साठी जे विद्यार्थी नोकरी व्यवसाय करत आहेत अशा विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे.**
- **एम.ए.शिक्षणशास्र हि पदवी महाराष्ट्र शासनाचे 15जुलै 2016 च्या पत्रकानुसार व एन.सी.टी.ई.च्या अधिसूचनेनुसार एम.एड.पदवीशी समकक्ष समजण्यात आली आहे. तसेच रातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांना निवडश्रेणीसाठी फायदा आहे.**
- **अध्ययन साहित्य सर्व विषयांसाठी उपलब्ध असुन ई-स्वरुपात(PDF Form) उपलब्ध असणार आहे.**

# परीक्षा पद्धती आणि उत्तीर्णतेचे निकष

## परीक्षा पद्धती

- सेमिस्टर पद्धती (Semester) असणार आहे. त्यामुळे वर्षातून दोनदा परीक्षा घेतल्या जातील.
- 60:40 नुसार परीक्षा पद्धती आहे. अशी एकूण 100 गुणांची प्रत्येक विषयाची परीक्षा होणार आहे.
- सैद्धांतिक (Theory) पेपरची लेखी परीक्षा 60 गुणांची असुन जळगाव,धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्याच्या ठिकाणी विद्यापीठाने दिलेल्या परीक्षा केंद्रांवर प्रत्यक्ष येऊन परीक्षा द्यावी लागणार आहे.
- 40 गुणांची अंतर्गत परीक्षा हि विभागाद्वारे घेतली जाईल. त्याबाबत सविस्तर सूचना आपला प्रवेश झाल्यानंतर दिल्या जातील.

## अंतर्गत कार्य

- दुसऱ्या सेमिस्टर मध्ये आंतरवासिता(Internship)कार्य किंवा तत्संबंधित कार्य पूर्ण करून अहवाल सादरीकरण आणि मौखिक परीक्षा घेतली जाईल.
- द्वितीय वर्षास म्हणजे तिसऱ्या सत्राच्या शेवटी संशोधन प्रस्ताव लेखन आणि सादरीकरण (Research Proposal Writing and Presentation) व त्यावर आधारित मौखिक परीक्षा घेतली जाईल.
- द्वितीय वर्षास म्हणजे चौथ्या सत्राच्या शेवटी संशोधन प्रकल्प/ अहवाल लेखन आणि मौखिक परीक्षा (Research Project/ Report Writing and Viva-voce) याप्रमाणे मुल्यमापन केले जाईल.
- अंतर्गत कार्यात घेतल्या जाणाऱ्या बाबींबाबत होणारा बदल विद्यार्थ्यांना बंधनकारक असेल.

## उत्तीर्णतेचे निकष

- एम.ए.शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम अंतर्गत उत्तीर्णतेसाठी प्रत्येक पेपरमध्ये 50% गुण मिळवणे अनिवार्य आहे. तसेच अंतर्गत कार्यातही सर्व ठिकाणी 50% गुण मिळवणे अनिवार्यच आहे.
- उर्वरित विविध विषयांतील एम.ए.आणि एम.कॉम. शिक्षणक्रम अंतर्गत उत्तीर्णतेसाठी प्रत्येक पेपरमध्ये 40% गुण मिळवणे अनिवार्य आहे. तसेच अंतर्गत कार्यातही सर्व ठिकाणी 40% गुण मिळवणे अनिवार्यच आहे.

## एकूण गुण

- दोन्ही वर्ष मिळून एकूण 2000 गुण असणार आहेत.

**अंतर्गत कार्यातील होणारे काही अपेक्षित बदलाबाबत सविस्तर सूचना दिल्या जातील.**

# पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षास ऑनलाईन प्रवेश सूचना 2023-24

## ऑनलाईन प्रवेश सुरुवात – दि.1/8 2023

**प्रथम वर्षासाठी ऑनलाईन प्रवेश मुदत आणि भरावे लागणारे शुल्क माहिती तक्ता**

- **विहित मुदतीत शुल्कासह प्रवेश घेतला तर शिक्षणक्रम निहाय जे शुल्क दिले आहे ते भरावे लागेल.**
- **ऑनलाईन प्रवेश मुदत संपल्यानंतर 15 दिवसांच्या आत आणि त्यानंतर प्रवेश घेतला तर प्रवेश शुल्क हे खालीलतक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विलंब शुल्कासह भरावे लागेल.**

| शिक्षणक्रम | ऑनलाईन भरावयाचे शुल्क (रू) | | | |
|---|---|---|---|---|
| | 1/8/23 ते 31/8/23 | 01/9/23 ते15/9/23 500 रू. विलंब शुल्कासह | 16/9/23 ते 30/9/23 1000 रू. विलंब शुल्कासह | 30/9/23 नंतर 2000 रू. विलंब शुल्कासह |
| एम.ए.मराठी (MA.Marathi) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |
| एम.ए.हिन्दी (MA.Hindi) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |
| एम.ए.इंग्रजी (MA.English) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |
| एम.ए.इतिहास MA.History) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |
| एम.ए.राज्यशास्त्र (MA.Political Science) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |
| एम.ए.समाजशास्त्र (MA.Sociology) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |
| एम.ए.अर्थशास्त्र (MA.Economics) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |
| एम.ए.संरक्षण व सामरिकशास्त्र (MA.Defence and Strategic Studies) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |
| एम.ए.समुपदेशन मानसशास्त्र (MA.Counselling Psychology) | 10,000/- | 10500/- | 11000/- | 12000/- |
| एम.ए.शिक्षणशास्त्र (MA.Education) | 15,000/- | 15500/- | 16000/- | 17000/- |
| एम.कॉम. (M.COM) | 8,500/- | 9000/- | 9,500/- | 10,500/- |

# महत्वाच्या सूचना

- प्रवेश घेण्यापूर्वी आपला फोटो,सही आणि संबंधित कागदपत्रे Scan करून ठेवा.
- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या **www.nmu.ac.in** या अधिकृत संकेतस्थळावर गेल्यानंतर वर असलेल्या आडव्या पट्ट्यावर (Horizontal Bar) **Academic** अंतर्गत **Department of Lifelong Learning and Extension, (DLLE) लिंक वर जाऊन Admission 2023-24 वर Click करावे.**
- प्रवेश अर्ज भरतांना सुरवातीला Click here to view video of how to Apply for Online Admission ह्या लिंक वर क्लिक करून सर्व माहिती जाणून घ्यावी मगच ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास सुरुवात करावी.
- प्रवेशाबद्दलची माहिती जाणून घेतल्यानंतर पेजच्या शेवटी Click Here To Apply Online Admission for AY 2023-24 लिंक वर क्लिक करावे.
- नवीन Page open झाले कि, **Click Here for Online Application for Admission of AY 2023-24** लिंक वर क्लिक करावे.
- या विद्यापीठाचे विद्यार्थी (Already Student of this University) असतील त्यांनी आपल्याकडील असलेला 16 अंकी (PNR NO.) टाकून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.
- जे विद्यार्थी पहिल्यांदा ह्या विद्यापीठातून प्रवेश घेऊ इच्छिता त्यांनी New Registration (I am a New Admission seeker in this University) क्लिक करावे व सर्व माहिती भरावी.
- ऑनलाईन प्रवेश अर्ज भरल्यानंतर आपण विभागात दूरध्वनी क्रमांक 0257-2257495/2258496 वर संपर्क साधावा. जोपर्यंत आपला अर्ज विभागातून approved होणार नाही तोपर्यंत Online payment करता येणार नाही.
- शुल्क पूर्ण वर्षाचे एकदाच भरावे लागेल.त्यात प्रवेश,अध्ययन साहित्य, परीक्षा व संबंधित इतर शुल्कासह एकत्रित असणार आहे.
- द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपला जो PRN क्रमांक यापूर्वी मिळाला आहे तो टाकून प्रक्रिया करावी.
- अर्ज भरतांना अपूर्ण किंवा चुकीची माहिती भरलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही.
- प्रवेश घेतांना चुकून दुसऱ्या शिक्षणक्रमांच्या प्रवेश शुल्क भरले तर कोणत्याही सबबीवर ते शुल्क परत मिळणार नाही व दुसऱ्या शिक्षणक्रमांसाठी जर समान शुल्क असेल तर ते वर्ग केले जात नाही. नव्याने शुल्क भरून शिक्षणक्रमास प्रवेश घ्यावा लागेल.

## महत्वाच्या सूचना

- **अध्ययन साहित्य (Study Material) हे SOFT COPY/PDF स्वरुपातच उपलब्ध होणार आहे याची नोंद घ्यावी.**

- ज्या विद्यार्थ्यांचे कागदपत्रे अपूर्ण असतील, त्यास किमान एक महिन्याच्या आत कागदपत्रे जमा करण्याच्या अटीवर प्रवेश अर्ज स्विकारण्यात येईल. त्या संदर्भातील अर्ज विद्यार्थ्याने आजीवन अध्ययन विभागाकडे देणे अनिवार्य राहील.

- द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबत विभागाद्वारे प्राप्त मूळ गुणपत्रकाची झेरॉक्स साक्षांकीत प्रत जोडावी. कृपया Online गुणपत्रिकेची झेरॉक्स जोडू नये. जर आपण गुणपत्रक घेतले नसेल तर विभागात दूरध्वनी क्रमांक 0257-2257495/2258496 वर संपर्क साधावा.

- **आजीवन अध्ययन विभागाच्या शिक्षणक्रम अंमलबजावणी अंतर्गत होणाऱ्या विविध प्रक्रियाबाबतचे निर्णय बदल यांबाबतचे सर्वाधिकार आजीवन अध्ययन विभागास राहातील. प्रवेश पात्रता व शिक्षणक्रम अंमलबजावणी बदल स्वीकारणे अध्ययनार्थ्यांना (विद्यार्थी) बंधनकारक राहिल.**

## अत्यंत महत्वाचे:-

- एकदा प्रवेश घेतल्यानंतर  कोणत्याही सबबीवर प्रवेश रद्द केला जाणार नाही व शुल्कही परत केले जाणार नाही.

- नवीन शैक्षणिक धोरणानुसार जे विद्यार्थी फक्त एम.ए. प्रथम वर्ष पूर्ण करतील आणि त्यांना द्वितीय वर्ष पूर्ण नाही करायचे तर त्यांना पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र दिले जाईल.उदा.एम.ए. मराठी प्रथम वर्ष उत्तीर्ण केले तर त्यांना PG Diploma in Marathi असे प्रमाणपत्र दिले जाईल.

- विद्यार्थ्याने (Student) आपला ऑनलाईन प्रवेशावेळी दिलेला ईमेल व पासवर्ड, भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) निकाल हातात येईपर्यंत काळजीपूर्वक जपून ठेवणे अनिवार्य राहिल. अन्यथा आजीवन अध्ययन विभागाकडून प्रवेश ते अंतिम निकालप्रक्रिये दरम्यान होणाऱ्या अंमलबजावणीची माहिती किया संदर्भिय बदल याबाबत वेळोवेळी पाठविले जाणारे संदेश (SMS) सुविधेचा लाभ मिळाला नाही व काही शैक्षणिक नुकसान झाल्यास विद्यार्थी त्यास स्वतः जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी.

**(टीप :- ईमेल व भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) हयांत बदल असल्यास त्वरीत आजीवन अध्ययन विभागाशी 0257-2257495/2258496 या दूरध्वनीवर किंवा प्रत्यक्ष येवून बदल करून घ्यावा.)**

## प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

- ✓ 10 वी किंवा 12 वीच्या Leaving Certificate ची छायांकित (Photocopy) प्रत
- ✓ पदवी उत्तीर्णतेचे गुणपत्रक आणि पदवी प्रमाणपत्राची छायांकित (Photocopy) प्रत
- ✓ मूळ स्थानांतरण प्रमाणपत्र (Original T.C.)
- ✓ इतर विद्यापीठाचे विद्यार्थी असतील तर वरील कागदपत्रांसोबत मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Original Migration) जोडणे अनिवार्यच आहे.
- ✓ नावात बदल असेल तर प्रकाशित राजपत्राची (Gazette) छायांकित (Photocopy) प्रत.
- ✓ राष्ट्रीय व राज्यस्तरावरील मुक्त विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांना स्थानांतरण प्रमाणपत्र (टी. सी.) विद्यापीठाकडून दिला जात नाही. म्हणून आजीवन अध्ययन अंतर्गत प्रवेशसाठी इच्छुक विद्यार्थ्याकडे त्या पूर्वी जी पदवी प्राप्त केली असेल, त्या पदवीच्या संदर्भात मुळस्थानांतरण प्रमाणपत्र (ओरीजनल टी.सी. / एल.सी.) तसेच विद्यापीठाचे मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (ओरीजनल मायग्रेशन सर्टिफिकेट) विद्यार्थ्याने प्रवेश घेतेवेळी जमा करणे अनिवार्य आहे.
- ✓ विद्यार्थ्याकडे मूळ स्थानांतरण प्रमाणपत्र (टी.सी.) नसेल किंवा हरवले असेल, अशा काही अपवादात्मक वेळी दुय्यम स्थानांतरण प्रमाणपत्र (डूप्लीकेट टी.सी.) सादर करता येईल. मात्र त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने सादर करता येईल. याबाबतची खोटी माहिती आढळल्यास विद्यार्थी त्यास जबाबदार राहील.

ऑनलाईन शुल्क भरल्यावर प्रवेश अर्जाची प्रिंट काढावी आणि तक्त्यात नमुद केलेली कागदपत्रे सोबत जोडून एकत्रितपणे खालील पत्त्यावर स्वतः किंवा स्पीड/रजिस्टर पोस्टाने विभागाने दिलेल्या मुदतीच्या आत जमा करावे.

### प्रवेश अर्ज जमा करण्यासाठी आणि संपर्कासाठी पत्ता


**आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग**
**Department of Lifelong Learning and Extension (DLLE)**
**डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम विद्यार्थी भवन,**
**पहिला मजला, रूम नं 204/205,रिक्षा स्टॉप जवळ,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
**पिन कोड - 425001**

### अधिक माहितीसाठी संपर्क-

**कार्यालय फोन नं. 0257-2257495/ 2258496**

**मोबाईल नं. 7058587636/ 7058502585/ 7875210672/ 9850478669**

**प्रा.डॉ.आशुतोष रमेश पाटील**
**संचालक,**
**आजीवन अध्ययन व विस्तार विभाग,**
**कबचौ उमवि,जळगाव**